यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत मौजे खर्डा (मुस्लीम मदारी वसाहत), ता.जामखेड, जि.अहमदनगर येथील एका वसाहत प्रकल्पास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन ज्ञापन क्रमांक : यचव २०१७/ प्र.क्र.७५/ मावक
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार ,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ : १. शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. गृनियो - २०१७/ प्र.क्र.६०/मावक, दिनांक २४.०१.२०१८
२.संचालक,विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय,पुणे यांचे पत्र क्र. विजाभज/ यचमुवयोज/ अहमदनगर/२०१७-१८/२७५५,दि.१७/११/२०१७.

ज्ञापन:-

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत खर्डा (मदारी वसाहत), ता.जामखेड, जि.अहमदनगर येथे सन २०१७-१८ या आर्थिकवर्षात २० कुटुंबांच्या एका वसाहतीला मान्यता देण्याबाबत संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र संचालनालय,पुणे यांनी त्यांचे संदर्भ क्र.२ येथील दि. १७/११/२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन कळविण्याचे आदेश आहे की, संदर्भ क्र. १ येथील दि. २४/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजातील घटकांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत केलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने सन २०१७-१८ या वर्षात मौजे खर्डा (मुस्लीम मदारी वसाहत), ता.जामखेड, जि.अहमदनगर येथील एका वसाहतीकरिता २० घरे (रु. ७०,०००/- प्रती घर या प्रमाणे) व अन्य बाबींसाठी एका वसाहतीकरिता जि.प. अहमदनगर, सार्वजनिक बांधकाम उप विभाग जामखेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार रु.८८,१०,२२३/- इतक्या खर्चास या ज्ञापनान्वये खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरवलेलया व छाननी अंती अंतीम केलेल्या लाभार्थी कुटुंबास सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.

२) सर्व लाभार्थ्यांची जात प्रमाणपत्रे फक्त विजाभज प्रवर्गाची असणे व त्यांची जात वैधता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

३) ज्या व्यक्तीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आहे. त्याच व्यक्तीस सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. दुसऱ्या व्यक्तीस त्याचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

४) उत्पन्नाचे दाखले हे सन २०१६-१७ किंवा सन २०१७-१८ या वर्षाचे सादर करणे आवश्यक राहतील.

५) सर्व लाभार्थीना आदेशाच्या दिनांकापासून एका महिन्यात अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६) ज्या व्यक्तीच्या नावात, पालकाच्या / वडिलाच्या नावात अथवा आडनावात तफावत आहे. ती तफावत दुर करण्यासाठी सबंधित व्यक्तीच्या नावाचा, पालकाच्या नावाचा व आडनावाचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

७) ज्या व्यक्तीच्या नावात, पालकाच्या / वडिलाच्या नावात किंवा आडनावात तफावत आहे अशा व्यक्तीस सदरहू योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

वरील सर्व कागदपत्रांची व अटींची पुर्तता झाल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी, अहमदनगर, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, नाशिक व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, अहमदनगर, यांची राहील.

२. सदरहू वसाहतीतील २० कुटुंबांकरीता इतर मुलभुत सोयी सुविधांसाठी एका वसाहतीसाठी शासन निर्णय दि. २४/०१/२०१८ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार कमाल मर्यादेत खर्च करणे अनुज्ञेय राहिल. याकरीता कोणत्याही परिस्थितीत अतिरीक्त निधी मंजुर केला जाणार नाही.

३. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी असतील. उपरोक्त अटींची पुर्तता केल्यानंतर सदरहू योजनेसाठी आवश्यक असलेली उपरोक्त रूपये ८८,१०,२२३/- एवढी तरतूद संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सबंधित यंत्रणेस वितरीत करतील.

४. याबाबतचा खर्च सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मागणी क्र.एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग याचे कल्याण, ०३ मागासवर्गाचे कल्याण,(०१)(०३) विमुक्त जाती भटक्या जमातीसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना (२२२५-डी-२४२) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखालील एकूण रुपये. ५४६४० हजार पैकी वितरीत करण्यात आलेल्या रु. ४३७१२ हजार इतक्या तरतूदीतून भागविण्यास आणि शासन निर्णय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र. गृनियो - २०१७ / प्र.क्र.६०/ विजाभज-१, दिनांक २४.०१.२०१८ मध्ये नमुद करण्यात आलेल्या सूचनेनुसार खर्च करण्यास या ज्ञापनाद्वारे शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

५. सदरहू शासन ज्ञापन शासनाच्या www.maharastra.gov.in या सकेंतस्थळावर प्रसिंध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०२०७१४३२५१८७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.02.07 14:40:22 +05'30'

(भा.र.गावित)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. जिल्हाधिकारी, अहमदनगर
२. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र संचालनालय,पुणे
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपुर
५.. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक
६. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,अहमदनगर
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर
९. निवड नस्ती (मावक)